115/18-1-19

झोपडपट्टी पुनर्वसन प्राधिकरण, पुणे.

मुथ्था चेंबर्स, सेनापती बापट रोड, पुणे-१६.

जा.क्र.झोपुप्रा/सप्रा/झोनिआ/१०३/२०१९.

दिनांक :-१८/०१/२०१९

# “झोपडपट्टी निर्मूलन आदेश”

ज्याअर्थी महाराष्ट्र शासनाने महाराष्ट्र झोपडपट्टी (सुधारणा, निर्मुलन व पुर्नविकास) अधिनियम १९७१ (अधिनियमाचा उल्लेख या पुढे ' उपरोक्त अधिनियम ' असा करणेत येत आहे.) चे कलम ३अ (१)(२) अन्वये पुणे महानगरपालिका क्षेत्राकरीता गृहनिर्माण विभागाकडील अधिसूचना क्र.झो.पु.यो.-२००४/प्र.क्र.२१३/झोपसु-१ दि.३०/०६/२००५ अन्वये झोपडपट्टी पुनर्वसन प्राधिकरणाची स्थापना केली आहे ;

ज्याअर्थी, उक्त अधिनियमाच्या कलम ३ब मधील तरतुदीनुसार पुणे व पिंपरी चिंचवड महानगरपालिकांच्या क्षेत्रासाठी व सर्वसाधारण झोपडपट्टी पुनर्वसन योजना या प्राधिकरणाकडुन तयार करणेत आलेली आहे. झोपडपट्टी पुनर्वसन प्राधिकरणाच्या मंजुरीने सदरची सर्वसाधारण झोपडपट्टी पुनर्वसन योजना महाराष्ट्र शासनाच्या राजपत्रात दि.०१/१२/२००५ रोजी अंतिमतः प्रसिध्द आहे ;

ज्याअर्थी, उपरोक्त अधिनियमातील तरतुदीनुसार अनुसूचीमध्ये नमुद केलेल्या क्षेत्रावर झोपडपट्टी पुनर्वसन योजना राबविण्याकरीता या प्राधिकरणाकडे १९९२ साली मे. सुयोग डेव्हलपमेंट कॉर्पोरेशन ने दि.२१/०५/१९९२ रोजी झोपडपट्टी पुनर्वसन योजनेचा दाखल केलेला प्रस्ताव मान्य होऊन दि.२४/०२/१९९५ रोजी मिळकतीचे ३,२२० चौ.मी. क्षेत्र गलिच्छ वस्ती विमुक्त क्षेत्र घोषित करण्यात आले. व त्यास दि.०१/०४/१९९५ रोजी इंडियन एक्सप्रेस या दैनिकात प्रसिध्दी देण्यात आली. त्यानंतर सदर आदेशास मा.प्रशासक तथा विभागीय आयुक्त यांनी दि.०७/०२/१९९६ रोजी मान्यता देवून संमतीपत्र क्र.३५५ दि.१५/०९/१९९९ द्वारे बांधकाम करण्याचे नकाशे मंजूर करण्यात आले. सदर मिळकत डेव्हलप करण्याकरीता मे.सुयोग डेव्हलपमेन्ट कॉरपोरेशन तर्फे मे. रायसोनी डेव्हलपर्स पुणे यांनी दि.२३/११/२००० रोजी केलेल्या नोंदणीकृत कुलमुखत्यार पत्राद्वारे नेमणुक करण्यात आली ;

दरम्यानचे काळात अनुसूचित जागेवरील झोपडीधारकांनी मे.कोर्टात दावे दाखल केल्यामुळे अनुसुचित जागेवरील झोपडपट्टी पुनर्वसन योजना तात्पुरती स्थगित ठेवण्यात आली. झोपडीधारकांनी दाखल केलेल्या सर्व दाव्याचे निकाल झोपडीधारकाचे विरोधात लागून अंतिम रिट पिटीशन नं.३९६९/२००१ चा निकाल मे.उच्च न्यायालयाने दि.२७/११/२००१ रोजी पारीत करुन अनुसूचित जागेवरील पात्रता सिध्द झालेल्या ५० रहिवाश्यांनी विकसकास संपुर्णपणे सहकार्य करण्याचे लेखी आश्वासन/हमीपत्र निकाल तारखेपासून दोन आठवडयांचे आत देण्याचा आदेश दिला. सदर आदेशानंतरही अनुसुचित जागेवरील झोपडपट्टीधारकांनी अनुसुचति जागेवरील झोपडपट्टी पुनर्वसन योजना राबविण्यास सहकार्य केले नाही. व त्या अनुषंगाने मे.उच्च न्यायालयाचे आदेशाचाही भंग केला आहे. सबब, अनुचित जागेवरील झोपडीधारकांना पुन्हा संधी देण्याची आवश्यकता राहिलेली नाही.

सबब, महाराष्ट्र झोपडपट्टी (सुधारणा, निर्मुलन व पुर्नविकास) अधिनियम १९७१ च्या सुधारीत कायद्यानुसार व यापुर्वी गलिच्छ वस्ती विमुक्त क्षेत्र म्हणुन दि.२४/०२/१९९५ रोजी घोषित केलेल्या अनुसुचित क्षेत्रावर झोपडपट्टी पुनर्वसन योजना राबविण्याचे निश्चित केले आहे.

अनुसुचित जागेवरील झोपडीधारकांची पात्रता (परिशिष्ट-२) निश्चित केलेली आहे.

सबब, पुनर्वसन योजना राबविणेकामी झोपडपट्टी पुनर्वसन क्षेत्रातील इमारती/ झोपडया पाडुन जमिन खुली करणे आवश्यक आहे.

त्याअर्थी, मी पांडुरंग पोले, मा.मुख्य कार्यकारी अधिकारी, झोपडपट्टी पुनर्वसन प्राधिकरण, पुणे व पिंपरी चिंचवड क्षेत्र, पुणे अधिनियमाचे कलम ३ड सह १२(१) अन्वये मला प्राप्त झालेल्या अधिकारानुसार खालील

अनुसुचीमध्ये नमुद केलेले क्षेत्र निर्मुलन क्षेत्र म्हणुन घोषित करीत आहे. अनुसुचीमध्ये नमुद क्षेत्रातील सर्व झोपडया/बांधकामे हा आदेश प्रसध्दि (सहा) आठवडयाच्या आत पाडुन टाकुन जमिन खुली केली पाहिजे. सदरचा आदेश खालील अटींवर देणेत येत आहे.

१. सदर आदेशापासुन तीन महिन्याच्या मुदतीच्या आत विकसकाने योजनेचे नकाशे मंजूर करुन प्रत्यक्ष बांधले पाहिजे.
२. विकसकाने योजनेचे काम चालू करणेपूर्वी विस्थपित होणाऱ्या पात्र लाभार्थीची राहणेची तात्पुरती पर्यायी व्यवस्था त्या सर्व सुविधांसह स्वःखर्चाने केली पाहिजे.
३. विकसकाने पुनर्वसन घटकाच्या इमारतीचे बांधकाम दोन वर्षात पूर्ण केले पाहिजे.
४. इमारतीचे बांधकाम पुर्ण झाल्यानंतर व इमारतीस भोगवटा प्रमाणपत्र दिल्यानंतर एक महिन्यात विकसकाने सदरनिकेचा ताबा लाभार्थींना दिला पाहिजे.
५. वाजवी व सबळ कारणामुळे इमारतीच्या बांधकामास विलंब झालेस मा.मुख्य कार्यकारी अधिकारी, झोपडपट्टी पुनर्वसन प्राधिकरण, पुणे यांच्या निर्देशानुसार विलंब कालावधीसाठी दंड आकारुन मुदतवाढ देण्यात येईल.
६. विकसकाने योजनेच्या बांधकामाची गुणवत्ता राखण्यात कसुर केल्यास अगर बांधकामाची प्रगती समाधानकारक, विकसकावर उपरोक्त अधिनियमाच्या कलम १३ अन्वये कारवाई करण्यात येईल.
७. पात्र लाभार्थ्यांना पुनर्वसन योजनेतील सदनिकांचा/ गाळयांचा ताब दिलेनंतर एक महिन्यात विकसकाने संक्रमण केले पाहिजे.
८. झोपडपट्टी पुनर्वसन प्राधिकरणाचे नियमावलीनुसार योजनेअंतर्गत आवश्यक ती सर्व कामे विकसकाने करणे बंधनकारक राहील.

## अनुसूची

| जमिनीचा तपशील | क्षेत्र (चौ.मी.) | चतु:सिमा |
|---|---|---|
| स.नं.८३, सि.स.नं.१९५४ (पै), हि.नं.७+८+९, गवळी वाडा, पर्वती, पुणे. | ३२२० चौ.मी. | **पुर्वेस -** लागु अंबिलओढा |
| | | **पश्चिमेस -** रस्ता |
| | | **उत्तरेस -** सि.स.नं.१९४८ ते १९५३ |
| | | **दक्षिणेस -** सि.स.नं.१९५४ पै. |

सदर योजनेसंबंधीची सर्व कागदपत्रे संबंधितांना पाहणेसाठी या कार्यालयामध्ये कार्यालयीन वेळेत उपलब्ध आहेत. सदरचा आदेश हा माझे सही शिक्क्यानिशी देणेत आला आहे.

**(पांडुरंग पोले)**
**मुख्य कार्यकारी अधिकारी**
झोपडपट्टी पुनर्वसन प्राधिकरण,
पुणे व पिंपरी चिंचवड क्षेत्र, पुणे

स्थळ - झोपडपट्टी पुनर्वसन प्राधिकरण, पुणे
दिनांक -